CNR No. MHPU13-001184-2022

# <u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२९१/२०२२ निशाणी ४५ लगत आदेश</u>

(श्री. बजाबा बाबु दगडे वि. श्री. लक्ष्मण बजाबा दगडे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांची कैफियत व जबाब दाखल करुन घेण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांचा मेंढपाळ हा मुख्य व्यवसाय असल्याने त्यांना सतत मेंढयांना चारा उपलब्ध करुन देण्यासाठी बाहेरगावी जावे लागत असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना त्यांचे वकीलांना सदरील दाव्याबाबत आवश्यक ती माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अशक्य झाले असल्याने प्रतिवादींना मुदतीत कैफियत देता आली नाही. सदरचा आदेश नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे व प्रतिवादींना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

२. सदरच्या अर्जावर वादीतर्फे म्हणणे दाखल केले आहे व अर्जातील मजकूर अमान्य केला आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना दि. ०८.०९.२०२२ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. कैफियत दाखल करण्यास एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचा विलंब झालेला आहे. त्यास प्रतिवादी तर्फे संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला.

४. रोजनामा पडताळून पाहिला असता प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दि. २१/०९/२०२२ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द दि.

०२/१२/२०२२ रोजी विना कैफियत आदेश झालेला आहे व प्रतिवादी क्र. ५ यांचे विरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. यावरुन प्रतिवादींनी कैफियत मुदतीमध्ये दिलेली नाही हे दिसून येते. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे कारण अर्जामध्ये नमूद केले आहे. त्याबाबत वादींनी नाकारलेले नाही. दाव्यातील वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता, दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याचा  विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी अर्ज मंजूर केल्याने मदतच होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्ज (नि.क्र.४५) मंजुर करणेत येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेविरुद्ध झालेला 'कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2024.07.12 17:52:15 +0530

सासवड.

**(श्रीमती एस. के. देशमुख)**

दिनांक – १०/०७/२०२४

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mr. P. V. Satpute |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Jt. Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C. Saswad. |
| (c) | Date of Judgment /Order | : | 10/07/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P. O. on | : | 11/07/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 12/07/2024 |